Vol 4 Issue 11 May 2015 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

## Welcome to GRT

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

International Recognized Double-Blind Peer Reviewed Multidisciplinary Research Journal
Golden Research Thoughts
ISSN 2231-5063 Impact Factor :3.4052(UIF)
Volume - 4 | Issue - 11 | May - 2015 Available online at www.aygrt.isrj.org

# छत्रपती संभाजीकालीन प्रशासन



राजाराम सोनवणे
(इतिहास विभाग प्रमुख) ॲड्. एम. एन. देशमुख महाविद्यालय , राजूर, ता. अकोले,

Short Profile :
Rajaram Sonavane is History Department Head and M . N . Let "maukha College, Puran , Tal . Akole"



## प्रस्तावना :

छत्रपती शिवाजीप्रमाणे संभाजीराजांचे प्रशासन हे महाराष्ट्र धर्मावर आधारलेले होते. डॉ. कमल गोखले म्हणतात, ‘‘देशाचा राजा म्हणून राजाने राजधर्म पाळावयाचा असतो. या राजधर्मात राज्याचे रक्षण, धर्मरक्षण, चोख न्यायदान, प्रजादक्षता, प्रजेचे अभय, रयतेची कळकळ इत्यादी अनेक कर्तव्ये समाविष्ट होतात’’[१] ही सर्व कर्तव्ये संभाजी महाराजांनी पाळली. डॉ. सेन आपल्या ‘Administrative system of the Marathas’ या पुस्तकात म्हणतात की, ‘‘Sambhaji had subverted his father’s system of adminis- tration and he had no unind to improve it ’’[२] हे सेन यांचे विधान अपुरे वाटते. कारण संभाजी महाराजांनी शिवकालीन प्रशासन कायम ठेवून ते समृध्द करण्याचा प्रयत्न केला. गो. स. सरदेसाई आपल्या ‘ उग्रप्रवृत्ती संभाजी ’ या पुस्तकात लिहितात की, ‘‘ छ. संभाजीचा राज्यकारभार मराठी राज्याला हितकारक नव्हता.’’[३] त्यांचे हे विधान पूर्वग्रहावर आधारलेले व चूकीचे आहे. संशोधकांनी चिटणीस बखरीच्या आधारे केलेली ही विधाने तेवढीच गैरलागू व अवास्तव वाटतात. प्रा. बाहेकर यांच्यामते, ‘‘आज उपलब्ध झालेल्या अस्सल ऐतिहासिक साधनांवरून संभाजी राजे अत्यंत बुध्दिमान, संयमी, क्षमाशील, उदार, न्यायनिहूर आणि लोक कल्याणकारी राजे होते. असे सिध्द होत आहे.’’[४] या पार्श्वभूमीवर येथे संभाजीकालीन प्रशासनावर नवा प्रकाश टाकावयाचा आहे. त्यांच्या प्रशासनाचे तत्वसूत्र सांगताना डॉ. कमल गोखले म्हणतात,‘‘ संभाजी राजेही शासनाचे मध्यबिंदू होते. तेही विविध धर्मांच्या आधाराने कायदे कानून करणारे, न्यायदानाचे प्रमुख आणि सेना प्रमुख होते. तेही विविध धर्मांच्या प्रजेच्या स्वास्थ्याची आणि स्थैर्याची हमी ते असत’’[५]

त्यांच्या भूमिका स्पष्ट करतांना पुढे डॉ. कमल गोखले म्हणतात, ‘‘ शिवाजी महाराजांप्रमाणेच त्यांनी सर्व बाबतीत आपल्याकडे अधिकार घेतलेले होते. या अधिकारांची अंमलबजावणी करावयाची वेळही त्यांच्या कारकिर्दीच्या पहिल्या वर्षा–दीडवर्षातच आली.’’[६] धोरण व अधिकारांची अंमलबजावणी करताना छ. संभाजी यांनी टाकलेली पावले ही लोक कल्याणकारी होती, हे लक्षात घेतले पाहिजे. संभाजीराजांच्या कारकिर्दीत औरंगजेब

स्वतः आपल्या लक्षावधी फौजेसह स्वराज्यात उतरलेला होता. स्वराज्याच्या प्रदेशातच त्याने युध्दभूमी निर्माण करून स्वराज्याला व संभाजीराजांना आव्हान दिले होते. स्वराज्यातील सर्व सामान्य रयत भयभीत झालेली होती. रयतेचा ज्यांच्याशी संबंध येतो व ज्याच्या विश्वासावर रयत रहात असते ते स्थानिक वतनदार मात्र परकीय शक्तीशी हात मिळवणी करीत असत. त्यामध्ये वतन मिळविण्याचा व वतन टिकविण्याचा उद्देश असे. मोगलांच्या प्रचंड शक्ती सामर्थ्यामुळे मनातून भीती बाळगून त्याच्या आश्रयास जात असत. परंतु अशाही बिकट परिस्थितीत सर्व वतनदारांशी चांगले संबंध ठेऊन त्यांना आपलेसे करून संभाजी राजांनी त्यांना राजी रोखले होते आणि प्रशासनावरील आपली पकड मजबूत केलेचे दिसून येते.[७] रयतेचा राजा ही त्यांची भूमिका अत्यंत निर्णायक होती. संभाजीची कागदपत्रावर आढळणारी मुद्रा पुढीलप्रमाणे होती.

''श्री शंभो :शिव जातस्य मुद्रा द्यो, रिवराजते ।
यदं कसेविनी लेखा वर्तते कस्य नो, परि ।। ''[८]

म्हणजेच छ. संभाजीची ही मुद्रा सूर्यप्रभेप्रमाणे शोभते, व ज्या मुद्रेचा आश्रय करणारी लेखा सुध्दा कोणावरही सत्ता चालविते, ती ही शिवपुत्र शंभूची मुद्रा प्रकाशमान होत आहे. याचाच अर्थ असा की छ. संभाजीचे प्रशासन हे सूर्यासारखे तेजस्वी स्वयंप्रकाशित होते. त्याचप्रमाणे छ. संभजीच्या पत्रव्यवहारावर पत्र समाप्तीची जी मुद्रा आहे ती, ''मर्या, देयं विज, यते.''[९] अशा प्रकारची आहे. छ. संभाजीने प्रत्येक वेळी प्रशासन कृतीमध्ये आणतांना मर्यादांचे पालन केले असल्याचे दिसून येते. छ. संभाजीचा महिलांकडे पाहण्याचा दृष्टीकोन उदार होता. असे मत प्र. न. देशपांडे यांनी म्हटले आहे. त्यांच्यामते, ''संभाजीने महाराणी येसूबाईला काही राजकीय अधिकार दिलेले होते, ही गोष्ट वैशिष्टयपूर्ण मनावी लागेल. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकपूर्व कारकीर्दीत राजमाता जिजाबाईचा राज्यकारभारावर काही प्रमाणात प्रभाव होता. तथापि शिवाजी महाराजांच्या कोणत्याही राणीला अगदी सोयराबाईला सुध्दा राजकीय अधिकार मिळालेला दिसत नाही. छ. संभाजीने आपल्या गैरहजेरीत राज्यशासन पाहण्याचा अधिकार राणी येसूबाईला दिला होता.''[१०] अधिकार प्रदान करताना त्यांनी घेतलेला हा पवित्रा खरोखर महत्त्वाचा वाटतो.

राजमंडळाविषयी डॉ. व्ही. टी. गुणे लिहितात, ''छत्रपतींचे अधिकार सार्वभौम असले तरी राजमंडळाच्या सहकार्याने , प्रसंगी सल्लामसलतीने, राज्यकारभार करण्याची पध्दती शिवाजी महाराजांनी स्वीकारली होती. छ. संभाजीनेही याच पध्दतीचा अवलंब करण्याचा कसोशीने प्रयत्न केला.''[११] त्यांनी ही पध्दत केवळ स्वीकारली असे नाही तर त्यामध्ये सुधारणाही केली. डॉ. कमल गोखले म्हणतात, ''संभाजी राजांच्या कारकर्दीत 'छदोंगामात्य' या पदाची अष्टप्रधानात भर पडली असा समज असला तरी शिवाजी महाराजांच्या राज्यभिषेक प्रसंगी ''उत्तरेस छंदोगामात्य प्रधान रघुनाथ पंडितराव सुवर्ण कलश मधुपूर्ण घेवून उभे राहिले.''[१२] असा उल्लेख आढळतो. अशा प्रकारचे बदल लक्षणीय म्हटले पाहिजेत.

प्र. नं. देशपांडे मुलकी व्यवस्थेबद्दल म्हणतात, शिवाजी महाराजांनी मुलकी व्यवस्थेसाठी जे घटक निर्माण केले होते, ते छत्रपती संभजीच्या कारकीर्दीत कायम होते. स्वराज्याची विभागणी प्रांतामध्ये (सरसुभा) केलेली असून अष्टप्रधानांपैकी जेष्ठ प्रधानांचे अधिपत्त्य या प्रांतावर असे. अशा प्रधानांना सरकारकून असे म्हणत असत. छ. संभाजीच्या कारकीर्दीत पंतप्रधान आणि सचिव यांच्या अधिपत्याखाली प्रांत होते. त्याचप्रमाणे छंदोगामात्य कवि कलश याच्याकडे कुडाळ भागाचे अधिपत्त्य होते. सरकारकूनांना प्रांताच्या व्यवस्थेसाठी सरसुभेदार मदत करीत असत. प्रांताची विभागणी सुभ्यांमध्ये केलेली होती. सुभ्याचे उत्पन्न एक लाख प्रतिवर्षी होत असे. सुभ्यावरील अधिका–यास सुभेदार असे म्हणत. सुभेदाराच्या मदतीसाठी मुजूमदार व कारकून असत. सुभ्यांची विभागणी 'तर्फ ' या घटकामध्ये करण्यात येत असत. या घटकावरील अधिका–यास 'हवालदार' असे म्हणत. त्याच्या मदतीसाठी काही दुय्यम अधिकारी असत. सर्वात लहान घटक म्हणजे मौजे किंवा गाव यावरील अधिका–यास 'मोकदम' (पाटील) असे म्हणत''[१३] ही व्यवस्था छ. संभाजीकालीन प्रशासनाची बैठक स्पष्ट करणारी आहे. छत्रपती संभाजीने शिवाजी महाराजांचे प्रजाहित धोरण धामधुमीच्या काळातही राबविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला व छत्रपती संभाजी हाही प्रजाहितदक्ष राजा होता, हे येथे आवर्जून लक्षात घेतले पाहिजे.[१४] हे त्यांचे धोरण

प्रत्यक्ष प्रशासकीय धोरणातून स्पष्ट होते.

प्रा. शिंदे सरकार म्हणतात, ''बंडखोरी करणा-या किंवा रयतेला त्रास देणा-या वतनदारांना संभाजी राजांनी चांगलाच इंगा दाखविला होता. विशेष करून शत्रूला मिळणा-या वतनदारांविषयी संभाजी राजांच्या मनात विलक्षण संताप असे. फितूर झालेला एखादा वतनदार परत स्वराज्यात आला तर संभाजी राजे त्याची खडसून हजेरी घेत असतं''[१५] अशा प्रकारची कडक शिस्त त्यांनी ठेवली होती. संभाजी राजांच्या न्यायव्यवस्थेबाबत पुढे ते म्हणतात, ''संभाजी महाराजांच्या अत्यंत धामधूमीच्या व प्रतिकूल परिस्थितीतही न्यायदानाचे काम निर्भिडपणे चालू होते.''[१६] त्यावरून प्रजाहितदक्षता प्रकट होते.

प्र. न. देशपांडे आर्थिक प्रशासनाबाबत म्हणतात, ''छत्रपती संभाजीच्या कारकीर्दीत लष्करावरील खर्चात मोठी वाढ झाली. औरंगजेबाच्या स्वारीमुळे स्वराज्यात आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली. युध्दक्षेत्र स्वराज्याच्या भूमीत निर्माण झाल्यामुळे मुलखाची अतोनात हानी झाली. गावेच्यागावे ओस पडली, लोक परागंदा होऊ लागले. देशमुखांना आपली वतने सुरक्षित राहतील याची खात्री वाटेना. त्यातच १६८५ ते १६८७ च्या काळात स्वराज्याच्या काही भागात दुष्काळाने थैमान घातले.''[१७] यावरून छ. संभाजीच्या कार्यकुशलतेचे आकलन होते. डॉ. पी. एस. जोशी म्हणतात, ''Taking into account the data given earlier it is clear that even though Sambhaji was a good administrator and a skilled general who gave impartial justice to the subjects.''[१८] यावरून संभाजी महाराज हे कुशल प्रशासक व सेनापती होते. त्यांनी छ. शिवाजी महाराजांप्रमाणेच रयतेच्या भाजीच्या देठाची सुध्दा काळजी घेतली आणि बहुत जनांना आधार दिला. अखंडपणे परिस्थितीशी सामना केला त्यातून त्यांचे श्रेष्ठत्व स्पष्ट होते.

## *संदर्भ ग्रंथ*


१) डॉ. गोखले कमल, – ''शिवपुत्र संभाजी' , कॉन्टीनेटल प्रकाशन पुणे, चौथी आवृत्ती, २००६ पृष्ठ –३३५

२) कित्ता पृष्ठ ३३६

३) सरदेसाई गो.स. –''मराठी रियासत उग्रप्रवृत्ती संभाजी'', खंड–२,पॉप्यूलर प्रकाशन, मुंबई, चौथी आवृत्ती,१९८६ पृष्ठ – २०

४) डॉ. बाहेकर एस. ए., '' हुतात्मा छत्रपती संभाजी राजे काल आणि कर्तुत्व'' कसब प्रकाशन जळगाव, प्रथमावृत्ती ,१९९६ उपरोक्त पृष्ठ २६०

५) डॉ. गोखले कमल, उपरोक्त पृष्ठ २२२

६) कित्ता पृष्ठ ३३८

७) शिंदे सरकार, ''छत्रपती संभाजी महाराज– महापराक्रमी व परमप्रतापी,'' सहयाद्री प्रकाशन, इस्लामपूर, पृष्ठ १५६

८) कित्ता पृष्ठ १६०

९) कित्ता पृष्ठ १६०

१०) डॉ. पवार जयसिंग, (संपा) ''छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ,'' मंजुश्री प्रकाशन कोल्हापूर, प्रथमावृत्ती, १९९० पृष्ठ २६०

११) कित्ता पृष्ठ २६०

१२) डॉ. गोखले कमल, उपरोक्त पृष्ठ ३४२

१३) डॉ. पवार जयसिंग, उपरोक्त पृष्ठ २६४

१४) कित्ता पृष्ठ २६५

१५) शिंदे सरकार, उपरोक्त पृष्ठ १७३

१६) कित्ता पृष्ठ १०८

१७) डॉ. पवार जयसिंग, उपरोक्त पृष्ठ २६७

१८) जोशी पी. एस. , छत्रपती संभाजी, प्रकाशन चंद व कंपनी, दिल्ली, प्रथमावृत्ती, १९९०, पृष्ठ ३०६

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org